पाश्चम महाराष्ट्रातील ल. पा. तलावांच्या
सांडव्याच्या संकल्पनासाठी महत्तम पूर विसर्ग

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०९१/४८/९१ ल. पा. २
दिनांक १५/३/९१

संदर्भ : १. मुख्य अभियेता, ल पा व भातसा यांचेकडील परिपत्रक क्रमांक एमएनएस १९६३/एमआय-१ दिनांक १/६/६४.

२. १९६६ सालचे मायनर इरिगेशन मॅन्युअल पृ क्र ३६४.

## परिपत्रक

लघु पाटबंधारे तलाव्यांच्या सांडव्यांच्या संकल्पनासाठी हिशोबास घ्यावयाच्या महत्तम पूर विसर्ग शासनाच्या संदर्भाधिन दिनांक १/६/६४ च्या परिपत्रकासोबत जोडलेल्या तक्त्याचा वापर करुन काढावा असे १९६६ सालच्या लघु पाटबंधारे विभाग पुस्तिकेच्या परिच्छेद क्रमांक ५.६.१ मध्ये नमुद केले आहे. या तक्त्यात ०.३८६ चौ.मैल ते ११५.८३ चौ.मैल पर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रफळासाठी "सी " या गुणकाच्या वेगवेगळ्या किंमती दिल्या आहेत. कोकणातील भौगोलिक परिस्थिती व पर्जन्यमान विचारात घेता महत्तम पूर विसर्ग काढण्यासाठी वापरावयाचा Q=CxA/Sqrt. of [A+4] या सुत्रात "सी " गुणकाची किंमत सरसकट ७००० घ्यावी असे आदेश शासनाच्या परिपत्रक क्रमांक एमएनएस १९६६/७१/६६ एमआर दिनांक २७/७/६६ अन्वये दिले आहेत.

गेल्या कांही वर्षात वादळी पाऊस होऊन पावसाची तीव्रता ताशी १० सेकंद एवढी आढळून आली आहे. कोकण विभागात तर ही तीव्रता ताशी १२.५ सेंटी मीटर ५ इंच एवढी आढळून आली आहे. धरण भरल्यानंतर अशा तीव्रतेचा पाऊस झाला तर सांडवा पुरेशा क्षमतेचा नसल्यास धरणास धोका निर्माण होऊ शकतो. लघु पाटबंधारे तलावांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सांडव्याची पूर वहन क्षमता पुरेशी असणे अत्यंत आवश्यक असल्याने सांडव्यासाठी पूर वहन क्षमता काढण्याबाबत पुढील प्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत.

| पाणलोट क्षेत्र | सर्वसाधारण क्षेत्र कोकण वगळून | कोकण |
|---|---|---|
| १. १५ चौ.कि.मीटर पर्यंत | २८ घ.मी. प्रती सेकंद प्रती चौ.कि.मी. | ३५ घ.मी. प्रती सेकंद प्रती चौ.कि.मी. |
| २. १५ चौ.कि.मीटर पेक्षा अधिक | १२५ X पा.चे वर्गमुळ<br>पा = पाणलोट क्षेत्र चौ. कि.मी. | १५० X पा.चे वर्गमुळ<br>पा = पाणलोट क्षेत्र चौ.कि.मी. |

२. प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्रस्ताव सादर करतांना व तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी वरील प्रमाणे सांडव्याच्या संकल्पनात सुधारणा करण्यांत यावी.

व.ना.चंद्रात्रेय
शासनाचे उप सचिव

प्रत सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग,ल.पा.शी संबंधित

सर्व अधिक्षक अभियेता पाटबंधारे विभाग,ल.पा.शी संबंधित

सर्व कार्यकारी अभियंता,पाटबंधारे विभाग,ल.पा.शी. संबंधित

प्रत उपसचिव ,ल.पा. पाटबंधारे विभाग,मंत्रालय,

अवर सचिव ,ल.पा. पाटबंधारे विभाग,मंत्रालय,

उपअभियंता, श्री देशपांडे, श्री. सबनीस, श्री परसनानी पाटबंधारे विभाग मंत्रालय,
ल.पा. १/२ व खारभूमि कार्यासने.